# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती बजेट सभा क्रमांक ४ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरूवार दिनांक १५/०२/२०२४ सकाळी ११-०० वाजता भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | डॉ.संगीता नांदूरकर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ६. | श्रीमती पल्लवी शिरसाठ | मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी |
| ७. | श्री. गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ८. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र.मुख्य लेखा परिक्षक |
| ९. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १०. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ११. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १२. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १४. | श्री. रितीक गोयर | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १५. | श्री. एन. के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| १७. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |
| १८. | श्री.संजय मोरे | कार्यालयीन अधीक्षक |
| १९. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २०. | श्री. कमलेश सोनवणे | कनिष्ठ अभि. नगररचना विभाग |
| २१. | श्री. अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २२. | श्री.राजेश गायकवाड | मनपा शिक्षण मंडळ |
| २३. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |

| | | |
|---|---|---|
| २४. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २५. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

बैठकीच्या प्रारंभी नवनियुक्त उपायुक्त श्री.हेमंत निकम यांचे स्वागत व सत्कार सभागृहाच्या वतीने करण्यात आला.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-३२ म.मुख्य लेखाधिकारी धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा/लेखा/२९७ दि. १३/०२/२०२४ रोजीच्या पत्रानुसार मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडेस सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. लेखाधिकारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०२३-२४ चे सुधारित व कलम ९५ नुसार सन २०२४ चे मूळ अंदाजपत्रक आज मे. स्थायी समिती समोर सादर करीत आहे. सन २०२३-२४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२४-२५ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. जमा व खर्चाचा अंदाज प्रथम मे. स्थायी समिती समोर व मे. स्थायीसमिती मार्फत नंतर मे. महासभा मध्ये सादर करुन मंजूर केला जातो. अर्थसंकल्प तयार करतांना वस्तुनिष्ठ व काटेकोर आर्थिक नियोजन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न कलेला आहे. धुळे महानगर पालिकेचा सुधारित अर्थ संकल्प सन २०२३-२४ मध्ये सुरवातीच्या शिल्लके सह महसुली तथा भांडवली जमा रुपये ६७५.३३ कोटीचा असून त्या मधून महसुली तथा भांडवली सखर्च रुपये ५७८.४१ कोटी अपेक्षित आहे. तसेच शासन निधी रु. ९६.८६ कोटी व मनपा निधीची रु.६ लक्ष निधी शिलकीचा अर्थसंकल्प सादर करीत आहे. तसेच सन २०२४-२४ चे मूळ अर्थ संकल्प सुरवातीच्या शिल्लकेसह महसुली तथा भांडवली जमा रुपये ७२५.३६ कोटी असून त्या मधून महसुली तथा भांडवली खर्च ७२३.३८ कोटी अपेक्षित आहे. यानुसार शासन अनुदानाचे रु.१.९३ कोटी व मनपा निधी रु. ५ लक्ष शिलकी चे मुळ अर्थसंकल्प सादर करीत आहोत.

म.आयुक्त आज धुळे महानगरपालिकेचा सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समितीमध्ये प्रशासनाच्या मार्फत धुळे मनपाचे मुख्य लेखाधिकारी गजानन पाटील यांनी मांडले. या प्रशासकीय अर्थ संकल्पाचे मी स्वागत करते. हाअर्थ संकल्प सर्व समावेशक करण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु त्यात काही गोष्टी राहिल्या असतील काही विभागांना त्यामध्ये काही ॲडीशन करायच्या असतील या गोष्टी करण्यासाठी पुढील ४ दिवस दिलेले आहे. अर्थ संकल्प सादर करण्यापूर्वी सर्व विभागांची मते जाणून घेतली आहे. असे असतांना ही काही गोष्टी आल्या नाही असे वाटत असेल तर प्रत्येक विभागाने काही गोष्टी राहिल्या असतील व काही नव्याने ॲड करायचे का हे पाहून घ्यावे. हे वर्ष अभूतपूर्व असे आहे.

शासनाच्या मोठया योजना येऊ घातल्या आहे. अमृत २ मध्ये २ मोठया योजना येत आहे. अलीकडेच मान्यता मिळालेल्या जिल्हा नगरोत्थान व स्टेट नगरोत्थान च्या मोठया योजना आहे. सोबत केंद्र शासनाच्या विकासाच्या योजना आहे. त्या साठी मोठया प्रमाणावर महाराष्ट्र शासनाला निधी प्राप्त झालेला आहे. त्यामधून ही काही निधी विकास योजनेतल्या कामांसाठी मिळणार आहे जसे की ट्रक टर्मिनस सोबतच प्रधानमंत्री ई बस चा प्रकल्प ही येऊ घातलेला आहे. या सर्व योजनांच्या तरतुदी या अर्थसंकल्पात घ्यायच्या आहे. या सर्वांचा अभ्यास करुन प्रत्येकांनी राहिलेल्या काही गोष्टी आल्यात हे बघावे. विशेषत: महिला बालकल्याण, शाळांच्या संदर्भात , अपंग कल्याणाच्या संदर्भात बजेट मध्ये या गोष्टींचा अंतर्भाव असावा. शाळांसाठीच्या तरतुदी, महिला बालकल्याण मध्ये विकासाच्या तरतुदी , अपंग कल्याणाच्या तरतुदी यांचा जाणीवपूर्वक अंतर्भाव करावा. लेखाधिकारी यांच्या कडून काही गोष्टींचा अंतर्भाव नसेल तर सर्व विभाग प्रमुखांनी आपापल्या विभागाचा काटेकोरपणे आढावा घ्या. या बजेट मध्ये किमान आपल्या शहरातल्या मराठी माध्यमातील ३-४ शाळा डेव्हलप होतील या हिशोबाने तरतुद करायची आहे. शक्यतो पेव्हर ब्लॉक , बसण्यासाठी बाक अशा ज्या लोकप्रिय तरतुदी आहे त्या तरतुदी टाळून व त्याच्या अंतर्भाव न करता खरोखर आवश्यक आहे ते घ्यावे. आपले जे पाचकंदील मार्केट आहे त्याच्या डेव्हलपमेंटची तरतुद यामध्ये करायची आहे. त्याच सोबत देवपूर मार्केट आहे उर्वरित जितके मार्केट असतील हे मार्केट डेव्हलपमेंट मनपाच्या शाश्वत आर्थिक विकासाला हातभार लावतील अशी सर्वांना अपेक्षा आहे. कराचे दर आपल्याला वाढवता येत नाही. पण आपले उत्पन्न कसे वाढेल यावरही फोकस करणार आहोत. मागील राहिलेली एलबीटी वसुली त्याची असेसमेंटची कामे या वर्षात पुन्हा करायची आहे. या वर्षात येणे दाखवायचे आपल्याला. याची काळजी आपण घ्यावी. दवाखान्या बाबतीत ही आपल्याला निधी मिळतो. पंचकर्म सेंटर निट करायचे आहे. पंचकर्माची सुविधा लोकांना कशी करुन देता येईल, दवाखाना खूप चांगल्या रितीने कसा चालवता येईल यावर फोकस करायचे आहे. आता ही सभा तहकूब करुन पुन्हा मंगळवारी घ्यायची आहे. सोमवारी स्थायीपुढे देण्यासाठी विषय नगरसचिवांकडे पोहचेल याची दक्षता घ्यावी. मनपावर जो आर्थिक भार आहे, मोठी देणी आहे, ठेकेदारांची देणी आहे, मनपा कर्मचाऱ्यांची देणे आहे. ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देऊ शकलो नाही. रिटायर्ड कर्मचाऱ्यांची परिस्थिती तीच आहे, शिक्षण मंडळातल्या शिक्षकांची परिस्थिती तीच आहे. शिक्षकांच्या ७ व्या वेतन आयोगाचा फरकाच्या रकमेचा हफ्ता देणे गरजेचे आहे. आपण यासाठी कुठलेही असंविधानिक शस्त्र वापरले नाही. ती सोशिकता आपण दाखवली त्यासाठी मी आपली आयुक्त म्हणून आभारी आहे. आपला प्रयत्न असेल की या वर्षामध्ये थकीत हफ्ते देण्यासाठी कटीबध्द असू. त्यासाठी आपलयाला वसुली वाढवावी लागणार आहे. ती या वर्षात करु. आपला फोकस वसुलीवर

असणार आहे. १००% वसुली करण्याचा प्रयत्न असणार आहे. ही सभा येथे तहकूब करुन येत्या २-३ दिवसात विभागाच्या तरतुदी द्याव्यात हे बजेट फुगीर असणार नाही. अत्यावश्यक गोष्टीसाठी तरतूद राहिल. रिझल्ट ओरिएन्टेड राहिल. असा आपला सर्वांचा प्रयत्न राहिल.

म.नगरसचिव मा.आयुक्त महोदयांच्या आदेशाने ही सभा तहकूब करत आहोत. तहकूब सभा पुनश्च घेण्यात येणार आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३२ दिनांक १५/०२/२०२४**

मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा/लेखा/२५७ दि. १२/०२/२०२४ अन्वये मा.आयुक्त सो.यांचेकडून(मा.स्थायी समिती) / मा.प्रशासक यांच्यापुढे सादर होणारे सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चांच्या अंदाजाचे विवरण सादर करण्यात आलेले असून अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चांच्या प्रत्येक बाबीवर सर्व विभागप्रमुख यांना अभ्यासासाठी व विचार विनिमय करण्यासाठी तसेच अंदाजपत्रकाबाबत अजून काही सुचना असल्यास त्या पुढील सभेत सूचीत करणेकामी सदरची सभा तहकुब करण्यात येत आहे.

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/-x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**